# संगमेश्वर कॉलेजची तृप्ती आवताडे हिची आशियाई आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



संगमेश्वर वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. तृप्ती आवताडे हिची क्वालालंपूर - मलेशिया येथे होणाऱ्या आशियाई आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तत्पूर्वी तिने योग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या तर्फे जयपूर येथे झालेल्या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्यामुळे तीची आशियाई स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तृप्तीने कटक (ओडिशा), होशियारपूर (पंजाब) रांची (झारखंड), भुवनेश्वर (ओडिशा), चेन्नई (तामिळनाडू) याठिकाणी झालेल्या विविध राष्ट्रीय योगासन स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व केले आहे. तृप्तीने आशियाई आंतरराष्ट्रीय आणि जागतिक योगासन स्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन करून संगमेश्वर कॉलेज आणि भारताचे नाव जागतिक पातळीवर नेले आहे. तीला योग शिक्षक श्री. सुभाष उपासे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संगमेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव मा. धर्मराज काडादी , प्राचार्य सौ. शोभा राजमान्य, जिमखाना चेअरमन प्रा. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. एस. एस. वांगी, प्रा. संतोष खेंडे, प्रा. व्ही. एस. विभुते सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी तृप्तीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.